# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

सकाळ
रविवार,
३१ ऑगस्ट २०१४
१०



राजगुरुनगर (ता. खेड) : 'सकाळ'च्या सर्व जल अभियानाला पाठिंबा देण्यासाठी पाणीबचत करण्याची प्रतिज्ञा घेताना हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थी.

## खेडमधील १०० गावांच्या पाण्याचे पूजन

### हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम

राजगुरुनगर, ता. ३० : 'सकाळ माध्यम समूहा'च्या सर्व जल अभियानाला पाठिंबा देण्यासाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तालुक्यातील शंभर गावांमधील पाणी एकत्र करून जलपूजन केले. या वेळी तीन हजार विद्यार्थ्यांनी पाणीबचतीची प्रतिज्ञा घेतली.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी या उपक्रमाबद्दल 'सकाळ'चे कौतुक केले. 'इर्जिक इंडिया फाउंडेशन'चे अध्यक्ष साई शिंदे यांनी 'सकाळ'ची सामाजिक उपक्रमाची परंपरा विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगितली. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी पारंपरिक वेश परिधान करून आपल्या गावातील पाणी कलशामध्ये घेऊन आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील नागरिकांना पाणीबचतीचे महत्त्व पटवून देण्याचा निर्धार केला आणि महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला.

या वेळी प्राचार्य एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. सी. व्ही. खेडकर, चार्टर्ड अकाउंटंट दिलीप कटारे उपस्थित होते. जलसंकल्प प्रतिज्ञेचे वाचन डॉ. संजय शिंदे यांनी केले. प्रा. दिलीप मुळूक यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख